

ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. भारती शेळके यांना प्रदान करताना ना. हसन मुश्रीफ. उपस्थित रा. कृ. कणबरकर, रामराव बेनाडीकर, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, चंद्रकांत पाटगावकर, उत्तमराव काळे आदी.
(छाया : तय्यब अली.)

# येत्या दोन वर्षात चौथीपर्यंतच्या मुलांना लिहिता वाचता न आल्यास राजीनामा : आ. मुश्रीफ

कोल्हापूर : येत्या दोन वर्षात चौथीपर्यंतच्या प्रत्येक मुलाला लिहिता, वाचता न आल्यास मंत्रीपदाचा राजीनामा देईन, असे प्रतिपादन कायदा विधी आणि शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले..

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने आयोजित कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान समारंभ मुश्रीफ यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाची सुरुवात उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थिनींच्या गीताने झाली. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष रा. कृ. कणबरकर यांनी केले. (पान २ वर)

पुढारी 18 जाने 05

# येत्या दोन वर्षात चौथीपर्यंतच्या मुलांना लिहिता, वाचता न आल्यास राजीनामा : आ. मुश्रीफ

(पान १ वरून)

त्यानंतर कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी आदर्श शिक्षक पुरस्काराची माहिती दिली.

यावर्षीचा ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार कमला महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. भारती शेळके यांना देण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरुप होते. पुरस्कार स्वीकारून डॉ. भारती शेळके यांनी आपल्या मनोगतात काकाजींनी दिलेला शिक्षणाचा आदर्श भविष्यात अखंडपणे चालू ठेवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आणि पुरस्कारात मिळालेली रोख रक्कम विद्यार्थी कल्याण मंडळाला दिल्याचे जाहीर केले. या प्रसंगी डॉ. सुरेश पाटील-लांडगे यांचा सत्कार त्यांनी केलेल्या कै. काकाजींबद्दलच्या शोध प्रबंधाबद्दल करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त चंद्रकांत पाटगावकर, उत्तमराव काळे, डी. बी. पाटील, सखारामबापू खराडे, एच. डी. पाटील आदींसह संस्थेचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. तेजस्विनी मुडेकर यांनी तर आभार प्रा. जयसिंगराव सावंत यांनी मानले.